आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात मोसमी पावसानं पदार्पणातच मोडला १०७ वर्षांचा विक्रम

- मुंबईसह कोकणात सर्वत्र मुसळधार पाऊस, आपत्कालीन यंत्रणा सतर्क

- देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट देशातच तयार व्हावी ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्रीय गृहमंत्री दोन दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर/ नागपूरमधे केलं विविध विकासकामांचं उद्घाटन

**आणि**

- पहिल्या खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धांमधे महाराष्ट्राला दुसरा क्रमांक

**<><><><>**

राज्यात नैऋत्य मोसमी पावसानं १०७ वर्षांचा विक्रम मोडत वेळेआधीच प्रवेश केला आहे. मुंबईत मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागांत, तसंच रेल्वेरुळांवर पाणी भरलं आहे. विमानांची उड्डाणंही उशिरानं सुरू आहेत. शहरातल्या ९६ धोकादायक इमारतींमधल्या तीन हजारापेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. हवामान विभागानं आज मुंबईसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढच्या २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता असून नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आली आहे. पुढचे काही दिवस मुंबई आणि राज्याच्या अनेक भागांत सतत जोरदार पावसाचा अंदाज असून नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचं पालन करावं आणि आवश्यक ती काळजी घ्यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

कोकणात सर्वत्र तसंच सोलापूर, सांगली इत्यादी ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे.

राजधानी मुंबईत कालपासून वादळी पाऊस होत असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. शहराच्या सखल भागात पाणी साचल्यानं वाहतुकीचा खोळंबा होत आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं रेल्वे सेवा प्रभावित झाली आहे.

सकाळी कार्यालयात जाणाऱ्या नोकरदारांचे त्यामुळे हाल झाले. कोकणातल्या सर्व जिल्ह्यांमधे मुसळधारपावसामुळे नद्या भरुन वाहू लागल्या आहेत.

<><><><>

मुंबई आणि परिसरात पावसामुळे बाधित झालेल्यांच्या मदतीसाठी सर्व यंत्रणा सुसज्ज असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या पाऊस बाधित क्षेत्राची पाहणी केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. मुंबईत अनेक ठिकाणी वेळेआधी तसंच अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. काही ठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा आता झाला असून वाहतूक सुरळीत सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी वार्ताहरांना दिली.

मुंबईत सध्या नालेसफाई सुरू असून ती लवकरच पूर्ण होईल. यापूर्वी मान्सूनपूर्व तयारीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पालिका प्रशासन, आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेण्यात आली होती. सर्व यंत्रणा सुसज्ज असून नागरिकांचा त्रास कमी व्हावा याची काळजी घेण्यात येत आहे. त्यांचे सर्व विभागांशी समन्वय साधला जात असल्याचं ते यावेळी म्हणाले. मुंबईत काही ठिकाणी दरड कोसळण्यासंदर्भातही आपण सेफ्टी नेट बांधण्याचे आदेश आयुक्तांना दिल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले.

बारामतीमध्ये गेल्या दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज निंबोडी, शेटफळगढे, मदनवाडी आणि भिगवण इथल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. य़ावेळी नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना त्यांनी केल्या आहेत. गेल्या ४८ तासात बारामतीत ३०७ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

पुण्याच्या खडकवासला धरणातून पाणी सोडण्याच्या आधी यंत्रणेला सज्ज होण्यासाठी  दोन तास आधी सूचना देण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी जितेंद्र डुडी यांनी जलसंपदा विभागाला दिल्या आहेत.

रत्नागिरीच्या खेड तालुक्यात जगबुडी नदीची पाणीपातळी वाढली असून, खेड ते दापोली रस्ता फुरुसजवळ बंद असून, वाहतूक पालगडमार्गे वळवण्यात आली आहे.

<><><><>

देशाच्या विकासासाठी आवश्यक सर्व गोष्टी देशातच तयार व्हाव्यात ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी २०१४ मध्ये भारताचे प्रधानमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज ११ वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त गुजरातमधे दाहोद इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रेल्वे इंजिन प्रकल्पासह, सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झालं. देशातलं औद्योगिक उत्पादन आणि निर्यातही सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक वस्तूंसह रेल्वे आणि मेट्रोचं तंत्रज्ञानही आपण इतर देशांना निर्यात करू लागलो असल्याचं ते म्हणाले.

गेल्या काही वर्षात देशानं दशकांच्या बेड्या झुगारणारे अभूतपूर्व निर्णय घेतले आहेत असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

आज १४० कोटी भारतीय विकसित भारताचा संकल्प साध्य करण्यासाठी झटत आहेत असं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी या प्रकल्पातच तयार झालेल्या पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वे इंजिनाला तसंच वलसाड - दाहोद एक्सप्रेस रेल्वे गाडीलाही हिरवा झेंडा दाखवला.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. या प्रकल्पातून उत्पादित इंजिन उच्च गुणवत्तेचं आणि कमी खर्चात तयार केलं जातय, त्यामुळे आपण त्याची निर्यातही करू शकणार आहोत असं अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं.

या कार्यक्रमाआधी प्रधानमंत्री मोदी वडोदरा येथील रोड शोमध्ये सहभागी झाले. नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी करत त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची भूमिका निभावलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांचं कुटुंबही या रोड शोमध्ये सहभागी झालं.

प्रधानमंत्री आज संध्याकाळी भूज इथंही सुमारे ५३ हजार ४०० कोटी रुपयांच्या विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण करणार आहेत.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं कतारमध्ये दोहा इथं शूरा परिषदेच्या उपसभापती डॉ. हमदा अल सुलैती आणि इतर कतारी खासदारांची भेट घेतली. हे शिष्टमंडळ येत्या काही दिवसांत दक्षिण आफ्रिका, इथिओपिया आणि इजिप्तला भेट देणार आहे.

खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं, न्यूयॉर्क इथं ९/११ स्मारकाला भेट देऊन दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना **त्यांनी** श्रद्धांजली वाहिली.

द्रविड मुनेत्र कळघम पक्षाच्या खासदार कनिमोळी यांच्या अध्यक्षतेखालच्या शिष्टमंडळानं मॉस्को दौरा यशस्वीपणे पूर्ण केला असून आता ते स्लोव्हेनियाकडे रवाना झाले आहेत. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त अरब अमिरातला गेलेल्या शिष्टमंडळानं आपला दौरा पूर्ण केला असून ते आता काँगोमध्ये पोहोचले आहेत.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नागपूरजवळ जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन, कामठी इथं राष्ट्रीय न्यायवैद्यक विद्यापीठाची पायाभरणी झाली. नॅशनल कँसर इन्सिट्यूट ही आगामी काळात देशातल्या प्रमुख कॅन्सर इन्स्टिट्यूटपैकी एक असेल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.  मध्यप्रदेश, छत्तीसगढ, आंध्र प्रदेश स्वस्ती आणि तेलंगणा या सर्व ठिकाणचे रुग्ण इथे उपचार घेऊ शकतील याबद्दल शाह यांनी समाधान व्यक्त केलं.  गेल्या दहा वर्षात देशातलं वैद्यकीय क्षेत्राचं चित्र बदललं असल्याचं सांगून  वैद्यकीय महाविद्यालयातल्या जागाही वाढवण्यात आल्याची माहिती शाह यांनी दिली,  केंद्र सरकार विविध योजनांच्या माध्यमातून गरिबांना ५ लाख ते ६० कोटींपर्यंतचे उपचार निःशुल्क उपलब्ध करुन देत असल्याचं ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

नॅशनल कँसर इन्सिट्यूटमध्ये जगभरातील अत्याधुनिक उपचारपद्धती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न असून या ठिकाणी एक प्रिमियर रिसर्च इन्स्टिट्यूट अर्थात संशोधन

संस्था म्हणून विकसित करणार येईल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. अमित शाह सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. काल रात्री त्यांचं नागपूरमध्ये आगमन झालं. आज ते नांदेडला रवाना होतील. नांदेड इथं माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण शहा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर ते शंखनाद या जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. नंतर अमित शहा मुंबईत येणार असून उद्या दक्षिण मुंबईतल्या माधवबाग लक्ष्मीनारायण मंदिराच्या दीडशेव्या वर्धापनदिन महोत्सवाला उपस्थित राहतील.

**<><><><>**

झारखंडमध्ये लातेहार भागात पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत सीपीआय माओवादी संघटनेचा कमांडर मनीष यादव ठार झाला आहे. मनीषवर पाच लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं. दरम्यान, या कारवाईत कुंदन खेरवार या अन्य एका माओवाद्याला अटक करण्यात आली असून त्याच्यावर १० लाख रुपयांचं बक्षीस होतं. काल रात्री झालेल्या चकमकीत जेजेएमपी या संघटनेचा कमांडर पप्पू लोहरा हा ठार झाला. त्याच्यावरही १० लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं.

**<><><><>**

दीवच्या समुद्र किनाऱ्यावर झालेल्या खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धेची काल सांगता झाली. या पहिल्याच बीच स्पर्धेत महाराष्ट्राने ५ सुवर्ण पदकांसह, ५ रौप्य, आणि १० कास्य अशी एकंदर २० पदकं जिंकत उपविजेतेपद पटकावलं. मणिपूर संघाला विजेतेपद मिळालं. महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये ३ सुवर्ण, ४ रौप्य आणि ५ कास्य अशी एकंदर १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. सागरी जलतरणातही २ सुवर्ण, १ रौप्य आणि २ कास्य पदकं मिळवली. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळात कांस्य पदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरलं. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक प्रदान करण्यात आला.

**//<><><><>//**